पुणे जिल्हयामध्ये उत्कृष्ठ दर्जाचे निसर्ग पर्यटन उद्यान निर्माण करण्याकरीता सुयोग्य वनक्षेत्राची निवड करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: निसप-२०१९/प्र.क्र.२९५/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०३ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना :-

पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास न होता निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी तसेच निसर्ग पर्यटनाला चालना देण्यासाठी, स्थानिक लोकांची संस्कृती जतन करण्यासाठी, तसेच पर्यटक व स्थानिक या दोघांनाही लाभप्रद व्हावे, यासाठी शासन निर्णय क्रमांक: डब्ल्युएलपी-१००२/प्र.क्र.५३/फ-१, दिनांक २०.०२.२००८ अन्वये राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण जाहीर करण्यात आलेले आहे. वनक्षेत्रात वनांना धक्का न लावता स्थानिकरित्या रोजगार निर्मिती करण्याची क्षमता निसर्ग पर्यटनामध्ये आहे. पर्यटन स्थळाचा विकास व उपयोग सुयोग्य पध्दतीने केला तरच वनांचे शाश्वत संवर्धनासोबत निसर्ग पर्यटनाला चालना मिळणे शक्य होईल.

या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हयामध्ये उत्कृष्ठ दर्जाचे निसर्ग पर्यटन उद्यान निर्माण करण्याकरीता सुयोग्य वनक्षेत्राची निवड करण्यासाठी सन्माननीय माजी राज्यमंत्री तथा विधानसभा सदस्य श्री. दिलीप ज्ञानदेव कांबळे यांचे अध्यक्षतेखाली वन अधिकारी व इतर सदस्यांचा समावेश असलेली एक समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचारीधीन होती.

शासन निर्णय :-

पुणे जिल्हयामध्ये उत्कृष्ठ दर्जाचे निसर्ग पर्यटन उद्यान निर्माण करण्याकरीता सुयोग्य वनक्षेत्राची निवड करण्यासाठी सन्माननीय माजी राज्यमंत्री तथा विधानसभा सदस्य श्री.दिलीप ज्ञानदेव कांबळे यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

१	श्री.दिलीप ज्ञानदेव कांबळे, माजी राज्यमंत्री तथा विधानसभा सदस्य	अध्यक्ष
२	श्री.राहुल सोलापूरकर	सदस्य
३	श्री.महेश पुंडे	सदस्य
४	श्रीमती श्रीलक्ष्मी, उप वन संरक्षक (प्रा.), पुणे	सदस्य
५	श्री.एम.जे.सानस, वन परिक्षेत्र अधिकारी, पुणे	सदस्य सचिव

०२. वरील समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

- पुणे जिल्हयामध्ये उत्कृष्ठ दर्जाचे निसर्ग पर्यटन उद्यान निर्माण करण्याकरीता सुयोग्य वनक्षेत्राची निवड करणे.
- निवड केलेल्या क्षेत्राची प्रभावी संरक्षण संवर्धन जैव विविधता निर्माण होण्याच्या दृष्टीने निसर्गपूरक कामे सुचविणे.

०३. सदर समितीने पुणे जिल्हयामध्ये उत्कृष्ठ दर्जाचे निसर्ग पर्यटन उद्यान निर्माण करण्याकरीता सुयोग्य वनक्षेत्राची निवड करणेबाबतचा अहवाल शासनास १ महिन्याच्या कालावधीत सादर करावा.

०४. सदर समितीने सुयोग्य वनक्षेत्राची निवड केल्यानंतर उपवनसंरक्षक (प्रा.) पुणे यांनी परिपूर्ण प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे मार्फत शासनास सादर करावा.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०३१७१२३०७७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.09.03 17:18:59 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वनविभाग

प्रति,

१. मा.श्री.दिलीप ज्ञानदेव कांबळे, माजी राज्यमंत्री तथा विधानसभा सदस्य
२. श्री.राहुल सोलापूरकर
३. श्री.महेश पुंडे
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
७. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे
८. उपवनसंरक्षक (प्रा.) पुणे
९. वन परिक्षेत्र अधिकारी, पुणे
१०. निवड नस्ती -फ-९